संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

रोखठोक बेधडक

संपादकीय....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# सचिनला आत्मचरित्र लिहिण्याची एवढी घाई का झाली

आपल्या देशामध्ये सेलिब्रिटी नावाचं एक प्रचंड मोठं मार्केट आहे. या मार्केटमध्ये सतत कोट्यवधी किंवा अब्जावधींची उलाढाल चालू असते. कर्तृत्वापेक्षा या मार्केटमध्ये नावाला जास्त महत्त्व मिळते. आणि मग अशा प्रसिध्द पावलेल्या नावांचे कोणकोणतं प्रॉडक्ट आहे आणि ते कसे जास्तीत जास्त किमतीला विकले जाईल, याचा सतत विचार सुरू असतो. चित्रपट क्षेत्रात तर अशा मार्केटला अजिबात कमतरता नाही. त्याच्यापाठोपाठ क्रिकेटचा नंबर लागतो. आणि राजकारण हे तिसऱ्या क्रमांकावर असते. सध्या अशाच सेलिब्रिटीजच्या मार्केटमध्ये क्रिकेटला महत्त्व आहे आणि त्यातल्या सचिन तेंडुलकर नावाच्या प्रॉडक्टला निवृत्तीनंतरही प्रचंड मागणी आहे. त्याचे अलीकडेच प्रकाशित झालेले 'प्लेईंग इट माय वे' या आत्मचरित्राचे नुकतेच प्रकाशन झाले. खरे तर त्याला आत्मचरित्र म्हणावे की म्हणू नये असा प्रश्न निर्माण होतो. आणि त्याची तशी दोन-तीन कारणेही आहेत. एक म्हणजे वयाची धड पन्नास वर्षेही अजून पूर्ण झाली नसताना सचिनच्या इतक्या छोट्या कारकिर्दीला आत्मचरित्र कसे काय म्हणावे, दुसरी गोष्ट म्हणजे या आत्मचरित्राचे लिखाण सचिन आणि बोरिया मुजुमदार यांनी ते लिहिल्याचा उल्लेख झाला आहे. एकतर आत्मचरित्र ज्याचे असते त्याचाच लेखक म्हणून उल्लेख होतो. फार तर फार लेखनाची कला अवगत नसेल तर ते कोणाकडून लिहून घेतले जाते आणि अशा लेखन करणाऱ्याला शब्दांकनकर्ता असे म्हटले जाते. सचिनचे आत्मचरित्र आणि बोरिया मुजुमदार याचेही लेखक म्हणून नाव हा प्रकार नेमका काय आहे, याचा उलगडा होत नाही. तिसरी बाब म्हणजे या आत्मचरित्रामधल्या अनेक गोष्टी अशा आहेत की, जे सचिनचे क्रिकेटविश्वातले अनुभव सांगतात.त्याचे आतापर्यंतचे आयुष्य हे क्रिकेटमय असल्यामुळे त्या कारकिर्दीचा सर्वाधिक उल्लेख असणे स्वाभाविक ठरते. परंतु या अनुभवांवर सचिनचे हे व्यक्तिगत मत त्यातून प्रकट व्हायला पाहिजे, ते तितकेसे होताना दिसत नाही. आणि म्हणून याला आत्मचरित्र म्हणावे की, अनुभव चित्र म्हणावे असाही प्रश्न पडतो. पहिला मुद्दा तर असा येतो की, आता कुठे सचिन क्रिकेटमधून निवृत्त झाला होता. निवृत्तीनंतरच्या काही वर्षांचा तटस्थ अनुभव त्याने घेतलेला नाही. त्याचे आताचे वय आणि निवृत्तीनंतरची त्याची क्रिकेटविषयक निरीक्षणे किंवा निवृत्तीनंतरचे त्याचे एकूण आयुष्य याकडे तो कसा बघतो. यासंदर्भात त्याची मते काय आहेत हे वाचणे रसिकांना आणखी आनंद देणारे ठरले असते. ज्या आत्मचरित्रामध्ये अजून खूप काही सचिनकडून ऐकण्यासारखे होते ते तसेच राहून गेले आहे. आणि म्हणूनच त्याला वयाच्या पन्नाशीच्या आत आत्मचरित्र लिहिण्याची घाई का झाली, हे कळत नाही.

### फार तर त्याला अनुभव चित्र म्हणावे

सचिन तेंडुलकर हा भारतीय क्रिकेटविश्वातला एक ध्रुव तारा ठरतो. त्याचे स्थान त्या ध्रुव ताऱ्याप्रमाणे अढळ आहे. असे असताना त्याने अधिक विचारपूर्वक, समजूतदारपणे आणि परिपक्वतेने आपल्या सगळ्या जीवनाचा लेखाजोखा मांडणे गरजेचे ठरते. लाखो रसिक ज्यावेळेला त्याच्यावर प्रेम करतात त्यावेळेला त्यांना आपल्या आयुष्यातल्या विविध घटनांमधून आपण नेमकेपणाने काय देणार आहोत किंवा आपल्या रसिकांनी आपल्या अनुभवातून नेमके काय घेतले पाहिजे, असा व्यापक विचार सचिनकडून अभिप्रेत होता. परंतु तसे घडलेले दिसत नाही. निवृत्तीनंतरच्या दीड-दोन वर्षांतच त्याने आत्मचरित्र प्रसिध्द करण्याची घाई केली. यामागे त्याची स्वतः ची इच्छा किती होती यापेक्षाही असे आत्मचरित्र त्याने लिहावे असा दबाव जास्त असावा, अशी शंका आल्याशिवाय राहात नाही. जसे आम्ही म्हटले आहे की, भारतात सेलिब्रिटीजच्या मार्केटमध्ये सतत नवनव्या गोष्टींचा शोध सुरू असतो. निवृत्तीनंतरही सचिन प्रकाशझोतात राहावा, असा हे आत्मचरित्र प्रसिध्द करण्यासाठी दबाव टाकणाऱ्यांचा हेतू दिसतो. कारण आज परिस्थिती अशी आहे की, सचिन हे नाव एखाद्या चलनी नाण्यासारखे आहे.त्याला प्रचंड मागणी आहे. त्याच्या नावाने कोणतीही गोष्ट सेलिब्रिटीजच्या मार्केटमध्ये नेहमीच वरच्या क्रमांकावर राहू शकते. इतर कोणत्याही सेलिब्रिटीजपेक्षा सचिनच्या चाहत्यांची संख्या प्रचंड आहे. भारतातल्या सामान्य बुध्दीच्या रसिकांची मानसिकताच अशी आहे की, आपल्याला आवडणाऱ्या गोष्टीसाठी ते फारसा विचार करत नाहीत. सचिनच्या नावाने आज काहीही विकले जाऊ शकते, विकवले जाऊ शकते, लिहिले जाऊ शकते आणि त्याला तितकी प्रचंड मागणीही येऊ शकते. त्याच्या आत्मचरित्राबाबत असाच प्रकार होणार आहे. या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभालाच इतकी प्रचंड प्रसिध्दी मिळाली की, कदाचित या पुस्तकाची विक्रमी विक्रीही झाली तरी नवल वाटू नये.

### पन्नास टक्के जीवनपट बाकी

सेलिब्रिटीजमध्ये सचिनचा अव्वल क्रमांक ठरतो. ही गोष्ट जरी खरी असली तरी सचिनचा एकूण भावस्वभाव त्याच्यातला मध्यमवर्गीय साधेपणा हा लपून राहत नाही.अशावेळी तो जेव्हा एखादी कृती करतो तेव्हा ती योग्य की अयोग्य याचा विचार त्याच्यावर प्रेम करणारा त्याचा चाहता करीत असतो. सचिनच्या नावाचा आम्ही कोणी मंडळी गैरफायदा घेत नाही ना अशीही शंका या चाहत्यांच्या मनाला चाटून जाते. म्हणूनच त्याने आत्मचरित्र लिहिण्याची घाई केली. अकाली प्रौढत्व दाखवून त्याने आत्मचरित्रासाठी फारशी योग्य वेळ निवडली नाही. यातला व्यावसायिक भाग सोडून दिला तर चाहत्यांच्या भावनिक मुद्याचा विचार केला तर त्यांना त्याच्याकडून निवृत्तीनंतर बरेच काही किस्से वाचायचे आहेत, ऐकायचे आहेत. कदाचित लोकाग्रहास्तव तो याच आत्मचरित्राची विस्तारित आवृत्ती पुढच्या पाच-दहा वर्षांमध्ये प्रकाशितही करू शकेल. परंतु एकूण भारतीय साहित्याची किंवा वाङ्मयाची परंपरा पाहिली तर आत्मचरित्र लिहिण्यासाठी वयाची किमान साठी उलटलेली असणे जास्त श्रेयस्कर मानले जाते. कारण याच साठाव्या वर्षांतल्या साठवणीमध्ये अनेक आठवणी दडलेल्या असतात. ते सांगण्यासाठी ते वय आणि तो कालावधी अधिक योग्य आणि प्रगल्भ असतो. या सगळ्या मुद्यांचा विचार केला तर अजून सचिनच्या आयुष्याचा पन्नास टक्के जीवनपट उलगडायचा बाकी आहे. म्हणूनच याला तूर्त आत्मचरित्र न म्हणता अनुभव चित्र म्हणावे. आणि अधिक आठवणी असलेले परिपूर्ण आत्मचरित्र त्याने सावकाशपणे लिहावे, कारण आयुष्याकडे मागे वळून पाहताना त्यातून नवा दृष्टिकोन त्याचा त्यालाच अनुभवता येईल.